D+
20-10-21
3:10

# उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग

जाक्र. उमपा/उपआयुक्त(कर)/२४९ /२०२१
दिनांक -२०/१०/२०२१

## प्रसिध्दीपत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. १९ दिनांक १७/०९/२०२१ अन्वये शहरातील मालमत्तांचे GIS आधारीत सर्व्हेक्षण पूर्ण करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतू GIS आधारीत मालमत्ता सर्व्हेक्षणाबाबत अफवा पसरविल्या जात असून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील कारणामुळे महापालिकेकडून सदरील कामाबाबतची वस्तुस्थितीदर्शक माहिती पुस्तिका महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.umc.gov.in) प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी नागरिकांनी सदर संकेतस्थळास भेट देऊन आवश्यक माहिती घ्यावी.

उल्हासनगर शहरातील नागरिकांना असे आवाहन करण्यात येत आहे की, कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. मालमत्तांचे GIS आधारीत मालमत्ता सर्व्हेक्षणाकरीता विरोध करु नये व आपल्या मिळकतीचे सर्व्हेक्षणकरुन घेऊन महापालिकेला सहकार्य करावे.

सर्व्हेक्षणाकरीता मे. कोल्ब्रो ग्रुपचे सर्व्हेअर येतील त्यांना महानगरपालिकेकडून ओळखपत्र देण्यात आलेले आहे. सर्व्हेक्षणाच्या कामी त्यांना सहकार्य करावे.

20/10/21
(प्रियंका राजपुत)
उप आयुक्त(कर)
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांचे मान्यतेने**